## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र. ८३६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/१२/२०१६

### १) अज्ञात वाहन चालकाच्या धडकेत जखमी होवुन इसम मरण पावल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक ०२/१२/२०१६ रोजी १९.०० वा.पासुन ते ०६/१२/२०१६ चे ०८.०० वा.दर. यातील मृतक सुखराम पाडुरंग वाल्दे वय ४५ वर्ष रा. डोंगरदेव यास कोणीतरी अज्ञात आरोपी वाहण चालकाने आपल्या ताब्यातील वाहण भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन धडक मारून जखमी केल्याने त्यास मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारादरम्यान दि. ०६/१२ /२०१६ ला मरण पावल्याने व पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जा.फौ. चे कागदपत्र टपालाने प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९, ३०४(अ) भादवी. सहकलम १८४,१३४ मोवका अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी बोरकुटे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

### २) निष्काळजीपने वाहन चालवुन इसमास जखमी करण्यास कारनीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :–

दिंनाक १६/१२/२०१६ चे २१.३० वा. दर. यातील फिर्यादी सोमेश्वर सुर्यभान वरखडे वय ३३ वर्ष रा. गौतम वार्ड पवनी हा आपले मो.सा. क्र. एमएच ३६ सी ८५४० ने आपल्या घराकडे आपले साईडने जात असतांना समोरून भंडाराकडे जाणा–या आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलला धडक मारून जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादवी.सहकलम १८४,१३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ.बावणे पो. स्टे. पवनी हे करीत आहे.

### ३) महीलेचा लज्जास्पद शब्दात बोलुन अपमान केल्याने गुन्हा नोंद. :–

दिंनाक २२/१२/२०१६ चे १५ दिवसा पुर्वी ११.०० वा. दर. यातील फिर्यादी ही इतर साक्षदार ३ महीलांसह गाव शेजारी जंगलात वाळलेल्या जळावु काळया आनण्यास गेली असता आरोपी क्र. १ व २ यांनी त्याचे जवळ येवुन फिर्यादी व तीचे सोबतचे महीलांना लज्जस्पद बोलुन अपमान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ५०९,३४ भादवी अन्वये गुन्हा दाखल करून तपासत घेतला . पुढील तपास पोहवा. पठाण पो. स्टे. लाखनी करीत आहे.

### ४) स्वत:चे अंगावर रॉकेल टाकुन इसम जळुन मरण पावल्याने गुन्हा नोंद. :–

दिनाक २२/१२/२०१६ चे ०९.०० वा. दर. यातील मृतक अजय कवडु शहारे वय ३७ वर्ष रा. खोकरला हा दारू पाणी पिण्याच्या सवईचा असल्याने त्याची पत्नी फिर्यादी ही मुलांना घेवुन वेगळी राहत होती मृतक हा दारू पाणी पिऊन रागाचे भरात त्याने आपले राहते घरात स्वत:चे अंगावर रॉकेल ओतुन स्वत:ला जाळुन घेऊन मरण पावल्याने फिर्यादी सौ. सुनिता अजय शहारे वय ३६ वर्ष रा. खोकरला यांचे तोंडी रिपोट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी शिंदे पो. स्टे. भंडारा हे करीत आहे.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक २२/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ५९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व ईतर वाहनांवरती ५० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.